|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र. १**

जळगाव दि.६ ( प्रतिनिधी ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्था व उत्तर प्रदेश टेक्सटाईल टेक्नॉलॉजी संस्था, कानपूर यांनी संयुक्तपणे `रिसेंट ॲडव्हॉन्सेस् इन पॉलिमर टेक्नॉलॉजी` या विषयावर दि. १६ व १७ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

पॉलिमर टेक्नॉलॉजी या विषयातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक तसेच संशोधन करणारे विद्यार्थी यांना सद्यस्थितीतील पॉलिमर टेक्नॉलॉजी या विषयाचे संशोधन व भविष्यातील संशोधन धोरण निश्चित करण्यासाठी या परिषदेचा उपयोग होणार आहे. भारतातील नामांकीत संस्था व औद्योगिक क्षेत्रातील नामांकीत कंपन्यामधील संशोधक आपले संशोधन सादर करणार आहेत. डॉ.भुवनेश गुप्ता, आय.आय.टी., दिल्ली यांचे बायोपॉलिमर इन द वर्ड ऑफ सस्टनायबीलीटी या विषयावर बीजभाषण होणार आहे. या परिषदेच्या आयोजनासाठी यु.आय.सी.टी.चे संचालक डॉ.जे.बी.नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून डॉ.जितेंद्र नारखेडे हे समन्वयक तसेच डॉ.रवींद्र पुरी हे सचिव म्हणून काम पाहत आहेत. तरी महाराष्ट्रातील या क्षेत्रात कार्यरत संशोधकांनी तसेच विद्यार्थ्यांनी या परिषदेत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या वेबसाईटला भेट द्यावी असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

---

**बातमी क्र. २**

जळगाव दि.६ ( प्रतिनिधी ) :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत टीसीएस, नाशिक या नामांकीत कंपनीतर्फे खुल्या परीसर मुलाखतींचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मुलाखतीसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयातील बी.ए., बी. कॉम, बी. एस्स्सी. (संगणक सोडून इतर शाखा), बीबीएम, बीबीएच्या पदवीच्या अंतिम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांनी टीसीएस या कंपनीच्या https:// nextstep.tcs.com/campus/#/ या संकेतस्थळावर प्रथम नाव नोंदणी दि.९ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत करण्याचे आवाहन कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. परिसर मुलाखती संदर्भात दिनांक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

---

**बातमी क्र. ३**

जळगाव. दि.६ (प्रतिनिधी) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने अभियांत्रिकी विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना आता छायांकित प्रत (फोटोकॉपी), गुणांची पडताळणी (व्हेरीफिकेशन) तसेच पडताळणीला आव्हान (रिड्रेसल) ची सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

यापूर्वी विद्यार्थी या प्रक्रियेसाठी महाविद्यालयात अर्ज जमा करत होते व महाविद्यालये हे अर्ज ऑनलाईन एन्ट्री करुन विद्यापीठाकडे सादर करीत होते. आता ही प्रक्रिया शीघ्रगतीने व्हावी यासाठी ऑनलाईन पध्दतीचा वापर केला जाणार आहे. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आता www.nmu.ac.in या संकेतस्थळावर जावून Student Corner या लिंकवर Application for Photocopy/ Verification/Redressal मध्ये उपलब्ध असलेल्या Student Manual येथे नमूद कार्यपध्दती नुसार अर्ज करावेत. तसेच या लिंकवर नियमानुसार आवश्यक ते शुल्क देखील ऑनलाईन पध्दतीने भरावेत. पुढील कार्यवाही बाबत विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे कळविले जाईल. मात्र काही विषयांचे अर्ज छापील नमून्यात महाविद्यालयामार्फतच आवश्यक त्या शुल्कासह प्रत्यक्ष सादर करावेत. त्यासंदर्भातील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी कळविले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ६ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी